■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३२७ ■ गुरूवार दि.१४ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 327 ■ Thursday Dt. 14 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# महाराष्ट्र आधार सेना आणि महाराष्ट्र आरंभ यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य सन्मान सोहळ्याचे आयोजन

**आरोग्य, पोलीस, पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्यांचा होणार मानाचा सन्मान**

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

**वसंत मुंडे, (प्रदेशाध्यक्ष मराठी पत्रकार संघ), संपादक विजयराज बंब, संपादक संतोष मानूरकर, शेख तय्यब, शेख कामरान आणि राजकीय-सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीने साजरा होणार भव्य कार्यक्रम!**

# माजीमंत्री धनंजय मुंडे आणि माजी आ. अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत

# यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणार सत्यशोधक पुरस्काराचा भव्य सोहळा!



**आ. विजयसिंह पंडित, ओमप्रकाश शेटे, सुभाष राऊत, राजेश्वर आबा चव्हाण, योगेश क्षीरसागर, रमेश आडसकर कल्याण आखाडे, स्वप्नील गलधर, अनिल जगताप, सचिन मुळूक, बाजीराव धर्माधिकारी, अविनाश नाईकवाडे, राजेभाऊ चाचा पौळ मान्यवरांची उपस्थिती लाभणार**

**बीड । प्रतिनिधी**

**सामाजिक कार्याची प्रेरणा आणि सेवाभावाची परंपरा जपत सत्यशोधक प्रतिष्ठान, थोरातवाडी (जि. बीड) यांच्यावतीने यावर्षीही भव्य सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दि,२१ ऑगस्ट २००८ पासून सुरू असलेल्या सत्यशोधक प्रतिष्ठान, थोरातवाडी (बीड) यांच्या वतीने दरवर्षी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा मान-सन्मान करण्याचा उपक्रम राबवला जात आहे. गेल्या १७-१८ वर्षांपासून या प्रतिष्ठानने अनेक समाजहितैषी व्यक्तींना गौरवले आहे. यावर्षीच्या कार्यक्रमात महाराष्ट्र आधार सेना यांची भर पडली असून, दैनिक महाराष्ट्र आरंभ परिवाराच्या वतीनेही या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करून सामाजिक कार्याचा गौरव केला जाणार आहे.**



या वर्षीच्या सोहळ्याला विशेष महत्त्व आहे कारण प्रतिष्ठानच्या या उपक्रमात महाराष्ट्र आधार सेना यांची औपचारिक भर पडली असून, दैनिक महाराष्ट्र आर्मीच्या वतीने देखील या कार्यक्रमाचे आयोजन भव्य स्वरूपात करण्यात आले आहे. यावेळी सामाजिक चळवळींना चालना देणारे, अन्यायाविरुद्ध उभे राहणारे आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना विशेष सन्मानचिन्ह, मानपत्र आणि पारितोषिक देऊन गौरवण्यात येणार आहे.

कार्यक्रमाला जिल्ह्यातील तसेच राज्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक, पत्रकार, युवा संघटनांचे पदाधिकारी आणि ग्रामस्तरावरील कार्यकर्ते उपस्थित राहणार असून, हा सोहळा समाजप्रबोधनाचा आणि प्रेरणादायी कार्याचा एक महत्वाचा टप्पा ठरणार आहे. सर्वांच्या सहकार्याने हा सोहळा अधिक भव्य स्वरूपात होणार आहे. समाजातील शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, न्यायहक्क चळवळी आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला जिल्ह्यासह राज्यभरातून मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून, सामाजिक ऐक्य, समानता आणि मानवतेचे संदेश देणारा हा सोहळा बीड जिल्ह्याच्या सामाजिक इतिहासातील एक महत्त्वपूर्ण पान ठरणार आहे. या सोहळ्याला अनेक





मान्यवरांची मानाची उपस्थिती लाभणार आहे. यात आमदार विजयसिंह पंडित, सुभाष राऊत, कल्याण आखाडे, स्वप्नील भैया गलधर, अनिल जगताप, सचिन मुळूक, बाजीराव धर्माधिकारी, राजेभाऊ चाचा आणि पौड यांचा समावेश आहे. या उपस्थितीमुळे कार्यक्रमाचा गौरव आणि भव्यता अधिक वाढणार आहे.

## आज काँग्रेस पक्षाच्या वतीने होणाऱ्या कॅन्डल मार्च मध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हा : गणेश बजगुडे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभेचे विरोधी पक्ष नेते मा. राहुलजी गांधी यांनी देशभरात झालेल्या मतदान चोरीच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेतलेला असुन भारतीय जनता पक्षाच्या सरकारने निवडणूक आयोगावर दबाव टाकून निवडणूक आयोगाच्या मदतीने मतदार यादीत मोठ्या प्रमाणात घोटाळे करुन मताची चोरी करुन हे सरकार सत्तेत बसलेले आहे.



खासदार राहुलजी गांधी यांनी हे सर्व पुराव्यासह देशवासीयांच्या समोर मांडलेले असुन निवडणूक आयोगाला जाब विचारण्यासाठी राहुल गांधी यांच्या नेतृत्वात देशातील ३०० खासदार निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे जात असताना त्यांना अडवून अटक करण्याचा अमानुष प्रकार केंद्रातील भाजप सरकारने केलेला असुन हा प्रकार अतिशय निंदनीय व देशाच्या इतिहासाला काळिमा फासणारा आहे. या सर्व प्रकरणाच्या विरोधात आज दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी सात वाजता बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते हुतात्मा स्मारक याठिकाणीवोट चोर खुर्ची छोड चा नारा देत कॅंडल मार्च काढण्यात येणार असुन काँग्रेस पक्ष व संविधानवादी सर्व समविचारी पक्ष संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन काँग्रेसचे बीड तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे.

## एक गाव - एक गणपती संकल्पना राबवा : सपोनि मंगेश साळवे

**आष्टी । प्रतिनिधी**

अगदी काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवाबद्दल सर्व गणेश भक्त व गावकरी यांच्याकडून सर्वत्र उत्सावाची तयारीही जोरदार चालु झालेली आहे. आपण सर्वजन बाप्पाची स्थापना प्रेमाने, भक्तीभावाने आणि उत्साहाने करतो. पण आपण कधी विचार केला आहे का? की, आपल्या गावात एक गाव - एक गणपती का असावा? गणपती म्हणजे एकतेचा आणि मंगलकार्याची देवता आहे.

गावातील वेगवेगळ्या मंडळांत गणपती बसवले, तर कधी कधी स्पर्धा वाढते, मतभेद निर्माण होतात, आणि काही वेळा तर ते वादातही रूपांतरित होतात आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन अनेक निरपराध व निष्पाप लोकांना त्याची झळ बसते. बाप्पाच्या नावाने आपण वाद करणे ही खरी श्रद्धाही नाही व भक्तीही नाही. एक गाव एक गणपती हा संकल्प केल्यास सर्व गावकरी एकत्र येतील. जात, धर्म, पंथ भेद विसरून जात गुण्या गोविंदाने नांदतील. एकाच गावात अनेक मंडप, शेड, मूर्ती, सजावट, मनोरंजन कर्यक्रम, ढोल-ताशे इत्यादी कर्यक्रमांवर होणारा मोठा खर्च वाचेल. वायफळ खर्च करण्याऐवजी तोच शिल्लक राहिलेला पैसा आपण आपल्या गावातील शाळा, आरोग्य, पाणी, रस्ते किंवा संस्कार शिबीर, कीर्तन सेवा, अन्नदान अथवा गरीब, अनाथ, निराधार कुटुंबांच्या मदतीसाठी वापरू शकतो.



आपला बाप्पा संपूर्ण जगाला एकतेचा संदेश देतो, विभाजनाचा नाही. अनेक गावांनी ही संकल्पना स्वीकारून गावातील आपआपसातील वाद व स्पर्धा कमी केलेली आहे. आणि त्यातून त्यांनी त्यांच्या गावाचा, गावकऱ्यांचा विकास वाढवला आहे. गणेशोत्सव अधिक सुंदर केला आहे. तिथे सगळे मंडळे, सर्व गावं एकत्र येऊन बाप्पाची सेवा करतात. गावात गावकऱ्यांमध्ये ऐक्याची भावना निर्माण होऊन ते गाव आदर्श गाव म्हणुन ओळखले जाते. हीच तर खरी भक्ती आणि सेवा आहे.

म्हणून मी अंभोरा पोलीस स्टेशन यांच्या वतीनेसर्व गावकऱ्यांची सुरक्षितता, गावाची एकता व गावाचा सर्वांगीण विकास डोळ्यासमोर ठेवून आपल्याला नम्र विनंती करण्यात येते की, गणपती बाप्पा मोरया - सर्व गाव एक होऊदे राया हा नारा देत, आपण सर्वजण या वर्षापासून एक गाव - एक गणपती ही संकल्पना आनंदाने स्वीकारूया. ही केवळ पोलीस प्रशासनाची अपेक्षा नाही तर ती, आपल्या गावाची, आपल्या संस्कृतीची, भक्तीची आणि आपल्या गावातील विकासाच्या उज्वल मार्गाची अपेक्षा आहे. आपण सर्व गावकरी यावर नक्कीच विचार कराल आणि गावाचं खरं हित कशात आहे हे समजून घेऊन योग्य निर्णय घेशाल याची आम्हाला खात्री आहे. आम्ही आपल्या सेवेत सदैव तत्पर अहोत.

## स्वातंत्र्य दिनाच्या ध्वजारोहण बहुसंख्येने उपस्थित रहा

### राष्ट्रीय एकात्मतेसाठी उद्या भव्य मोटारसायकल रैली मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : शेख एजाज, शिवाजीराव भोसकर

**बीड । प्रतिनिधी**

येत्या १५ ऑगस्ट मंगलवार रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्ताने दरवर्षीप्रमाणे यावेळीही एआयएमआयएम च्या बीड शहरातील बशीरगंज येथील मुख्य कार्यालयात ध्वजारोहण साठी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील पक्षाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी तेथील स्थानिक कार्यालयात सुद्धा ध्वजारोहण करावे. असे आवाहन पक्षाचे मा जिल्हा उपाध्यक्ष तथा बीड तालुकाध्यक्ष शेख एजाज खन्ना भैय्या आणि बीड मा. शहराध्यक्ष शिवाजीराव भोसकर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

या विषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, एआयएमआयएम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार अल्हाज बॅरिस्टर असदुद्दीन ओवैसी याांच्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा मा खासदार इम्तियाज जलील, यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी आपल्या भारत देशाच्या राष्ट्रीय सणांना पक्षाच्या मुख्य कार्यालयात ध्वजारोहण करत साजरे करून प्रत्येकाच्या मनात राष्ट्रभक्तीचे स्फुलिंग पेटवितो. यावेळीही स्वातंत्र्य दिनाच्या दिनानिमित्त सुद्धा बीड शहरातील बशीरगंज भागात असलेल्या पक्षाच्या मुख्य कार्यालयात पक्षाचे मा जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ यांच्या शुभहस्ते दिनांक १५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी सकाळी ०९:३० वाजता ध्वजारोहण करून राष्ट्रीय ध्वजाला सलामी देण्यात येईल. राष्ट्रगीत होईल. त्यानंतर बीड शहरामध्ये भव्य मोटारसायकल रैली चे आयोजन करण्यात आले आहे. तरी मोठ्या संख्येने सहभागी व्हा असे आवाहन देखील करण्यात आले. तरी इतर तालुक्यातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सकाळी ०९:३० वाजता पक्षाच्या मुख्य कार्यालयात उपस्थित राहावे. तसेच जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी तेथील स्थानिक कार्यालयात ध्वजारोहण करावे, असे आवाहन पक्षाचे मा जिल्हा उपाध्यक्ष तथा बीड तालुकाध्यक्ष शेख एजाज खन्ना भैय्या आणि मा बीड शहराध्यक्ष शिवाजीराव भोसकर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.



## मा.ना. छगनरावजी भुजबळ साहेबांना दैवत मानून ओबीसी समाजासाठी अहोरात्र लढणारा सच्चा समता सैनिक : ॲड. सुभाष (भाऊ) राऊत







भुतलावर जन्माला आलेला प्रत्येक माणूस आपण, आपलं कुटूंब, आपला संसार, आपला व्यवसाय या संकुचित विचारातच आपले आयुष्य जगत असतो; परंतू हे विश्वची माझे घर' असं समजून या भुतलावरील प्रत्येक व्यक्तीशी आपलं काहीतरी नातं आहे. ज्यामुळे आपण येथील प्रत्येकाच्या कामी यावे असा विचार करणारे काही लोक आहेत. त्यांना स्वार्थी जीवन जगणे आवडत नाही. परोपकारातच ते आपलं आयुष्य जगत असतात. अशा व्यक्ती महान होतात. यातीलच एक नाव म्हणजे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य आणि ना. छगनराव भुजबळ साहेब यांना दैवत मानून ओबीसी समाजाच्या हक्कासाठी अहोरात्र लढणारा सच्चा समता सैनिक म्हणजे ॲड. सुभाष भाऊ राऊत... आज दि.१५ ऑगस्ट रोजी त्यांचा वाढदिवस... त्यानिमित्त त्यांना कोटी कोटी शुभेच्छा..! ॲड. सुभाष भाऊ राऊत यांचा जनसंपर्क दांगडा असल्याने बीड जिल्हयातच नव्हे तर महाराष्ट्रात ते चांगलेच परिचित आहेत. समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष या पदावर कार्य करीत असतांना कार्यकर्ता कसा असावा याचा आदर्श त्यांनी निर्माण केला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन समता परिषदेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष राज्याचे कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ साहेब यांनी ॲड. सुभाष भाऊ राऊत यांची समता परिषदेच्या राज्य उपाध्यक्षपदी आणि आता प्रदेश सरचिटणीस पदी निवड केली आहे. मागील पंचवार्षिकमध्ये राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष पदही (राज्यमंत्री दर्जा असलेले) त्यांनी काही दिवस भूषविले. तसेच बीड नगरपालिका निवडणुकीत देखील दोन पंचवार्षिकला भरघोस मताने ते विजयी झालेले आहेत. बीड नगरपालिकेचे दहा वर्ष नगरसेवक आणि बांधकाम सभापती पद भूषविल्यामुळे त्यांचा बीड शहरात मोठा जनसंपर्क झालेला आहे. या कालावधीमध्ये अनेक गोरगरिबांची कामे त्यांच्या हातून झाली. ओबीसी समाजात त्यांचा जन्म झाला असल्याने ओबीसी समाजाबद्दल त्यांना आत्मियता असणे साहजीकच आहे. मात्र ओबीसी समाजाबरोबर इतर सर्वच समाजात त्यांना मानणारा वर्गही मोठा आहे. आपण किती चांगले आहोत हे सांगतांना दुसऱ्यांना वाईट, हीन लेखणं त्यांच्या स्वभावात नाही. प्रत्येकजण आपल्या जागेवर चांगला असतो. आपला बघण्याचा दृष्टीकोण जसा असतो तसा समोरचा व्यक्ती दिसतो हे सांगायला ते कधीच विसरत नाहीत.

गेल्या वीस ते पंचवीस वर्षापासून समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष या पदावर काम करीत असतांना त्यांनी कुंभार, नाभीक, सुतार, भुई, सोनार, बंजारा, साळी, माळी, तेली, कोष्टी, लोहार, गुरव, बागवान, आतार, मन्यार, कासार अशा ओबीसी समुहातील लहान, लहान जातींना एकत्रीत करून ओबीसींचे मजबुत संघटन निर्माण केले आहे. ओबीसी चळवळीत काम करीत असतांना ओबीसींची जातनिहाय जनगणना व्हावी, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे नियमीत वाटप व्हावे, मंडल आयोगाची १०० टक्के अंमलबजावणी व्हावी, ओबीसीतील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण असावे अशा विविध प्रश्नांवर वेळोवेळी आंदोलने, मोर्चे, धरणे, रास्तारोको करून ओबीसी चळवळ गतीमान केली. त्यांनी काढलेला धक्का लागे बुक्का मोर्चा महाराष्ट्रात चांगलाच गाजला होता. काही महिन्यांपूर्वी त्यांनी ओबीसींचा महामुकमोर्चा काढून शासनाचे लक्ष वेधून घेतले होते. विशेष बाब म्हणजे या महामोर्चात पहिल्यांदाच विद्यार्थी विद्यार्थीनी, महिला, पुरूष जवळपास अडीच ते तीन लाख ओबीसी समाज बांधव सहभागी झाले होते.

आंदोलनांबरोबरच ओबीसी विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभाचे ते प्रतिवर्षी आयोजन करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन देण्याचे कार्य करतात. राज्यस्तरीय एकांकिका, नृत्य स्पर्धा, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षीका पुरस्कार असे सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना व्यासपीठ निर्माण करून देण्याबरोबरच समाजातील गुणीजणांचा सत्कार करण्याचे कार्यही करतात. क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती अशा महापुरुषांच्या आणि संत महात्म्यांच्या जयंती, पुण्यतिथीमध्ये ते नेहमीच तन - मन - धनाने सक्रिय सहभागी असतात. ओबीसींचे राष्ट्रीय नेतृत्व स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे निधन, ओबीसी चळवळीतील झुंजार नेतृत्व स्मृतीशेष हनुमंतराव उपरे यांचे निधन आणि ओबीसींचा बुलंद आवाज राष्ट्रीय नेते आ. छगनराव भुजबळ यांना अटक झाल्यानंतर ओबीसी चळवळ पोरकी झाली होती. अशा परिस्थितीत अनेकांनी ओबीसी चळवळीतून माघार घेतली. मात्र सच्चा कार्यकर्ता आणि समाजसेवक कधीच माघार घेत नसतो हे ॲड. सुभाष भाऊ राऊत यांनी दाखवून दिले. मा.ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्यावर खोटे आरोप करून सुडबुध्दीने अटक केल्यानंतर ओबीसी चळवळीला खंड पडू न देता अधिक जोमाने ओबीसी चळवळ वाढविण्याचे काम ॲड. सुभाष भाऊ राऊत यांनी केले आहे. त्यांच्या विविध आंदोलनांनी जेलमध्ये असतांनाही ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या पाठीशी संपूर्ण ओबीसी समाज असल्याचे दाखवून देवून त्यांनी भुजबळांच्या भुजातील बळ वाढविण्याचे काम केले.

नेत्यासाठी कार्यकर्ता, समाजासाठी समाजसेवक, मित्रांसाठी भाऊ, कुटूंबासाठी कर्तापुरूष अशा विविध भूमिका या जीवनपटावर राबवीत असताना ॲड. सुभाष भाऊ राऊत यांनी शत्रु निर्माण होऊ न देता प्रत्येकाला आपला मित्र करीत ओबीसी चळवळ भक्कम केली. मराठा आरक्षणाची मागणी होत असताना ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कसल्याही प्रकारे धक्का न लावता मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्यात यावे अशी भूमिका त्यांनी खंबीरपणे मांडली. काही दिवसांपूर्वी काही समाजकंटकांनी ॲड. सुभाष भाऊ राऊत यांना ओबीसी चळवळीपासून परावृत्त करण्यासाठी मनसुबे बांधले, त्यांना आयुष्यातून उठविण्याचा प्रयत्न केला तरी देखील कसल्याही प्रकारे न डगमगता त्यांनी पुन्हा सच्चा कार्यकर्ता कधीही संपत नसतो आणि त्याला संपविण्याचा प्रयत्न कोणीही करू शकत नाही हे समाजकंटकांना दाखवून दिले. ॲड. सुभाष भाऊ राऊत यांनी ओबीसी समाजाच्या मागण्यांसाठी तटस्थ उभे राहून ओबीसी आरक्षणाची चळवळ भक्कमपणे उभी केली. ओबीसी चळवळी बरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी गेल्या तीन पंचवार्षिक पासून ते मोठ्या मताधिक्याने निवडून गोरगरीब किंवा ज्याचे काम विद्यापीठात अडले आहे. अशा प्रत्येकाचे काम नि:संकोचपणे ते करतात. या ठिकाणी समोरील व्यक्ती कोणत्या जाती धर्माचा आहे, याचा विचार देखील त्यांच्या मनात कधीच येत नाही. अशा ओबीसीतील उमलत्या नेतृत्वाचा आज वाढदिवस त्यानिमित्त त्यांना उदंड आयुष्य लाभो ही आई तुळजाभवानी चरणी प्रार्थना व वाढदिवसाच्या कोटी कोटी हार्दिक शुभेच्छा...!

**निखिल शिंदे**
**शहराध्यक्ष : समता परिषद बीड.**